**रे. दि. मु. क्रमांक ८२/२०१२ मधील नि.क्र. ५० खालील आदेश.**
**रविंद्र सोनवणे व इतर -विरुध्द- मोहन देडे व इतर**
**आदेश पारित दिनांक ०१.०२.२०२३**

---

वादींनी प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला उशीर माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जासहीत वादीचे वारस श्री. रविंद्र बाबूराव सोनवणे यांचे निशाणी क्र. ५१ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादीचे असे कथन आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे हे दिनांक २९.०७.२०२२ रोजी मयत झाले आहेत. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, वादी यांना प्रतिवादी क्र. १ यांच्या मृत्यूची माहिती उशीरा झाल्याने प्रतिवादी क्र. १ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला. त्यामुळे वादीने मयत प्रतिवादी क्र. १ मोहन देडे यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला उशीर माफ होवून मिळावा, अशी विनंती केली आहे.

०३. सदरकामी, प्रतिवादींतर्फे असे म्हणणे की, सदरकामी योग्य तो आदेश पारित व्हावा. परंतु, प्रतिवादी क्र. १ चे वारस क्र. १-इ यांचे नाव अरुणा किसन ठोंबरे असे आहे, त्याप्रमाणे दुरूस्ती व्हावी.

०४. वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे हे दिनांक २९.०७.२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र. १ मोहन देडे यांचे वारस मुदतीत दाखल करणेस ५ महिने, ८ दिवसांचा विलंब झाला आहे. सदरील दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकरिता प्रतिवादी क्र. १ मोहन यांचे वारस अभिलेखावर असणे आवश्यक आहे.

०५. सदरकामी, मयत प्रतिवादी क्र. १ मोहन देडे यांचे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर देणेकरिता मदत होणार आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचा अंतिम निकाल होणेकरिता मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांची नावे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांची नावे

विहित वेळेत अभिलेखावर घेतले नसल्याचे संयुक्तीक कारण अर्जात नमूद केले आहे. परंतू, प्रस्तूत मयत प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता उशीर झाल्यामुळे सदर प्रकरण लांबणीवर पडलेले आहे. त्यामुळे वादीस सदर विलंबाकरिता कॉस्टची आकारणी करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. तरी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ५० चा अर्ज रक्कम रुपये २००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) इतक्या कॉस्टच्या आकारणीवर मंजूर करण्यात येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी. |
| २. | मयत प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

दिनांकः- ०१.०२.२०२३